# नियमीत दिवाणी दावा क्र.१०८/२०२२ मध्ये निशाणी ४३ वरील आदेश

०१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी नं.१ व यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ अन्वये दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादी नं.१ व ७ यांचे असे कथन आहे की, वादीने त्यांच्याविरूध्द प्रस्तुतचा दावा ठराव, निरंतर ताकिद व खरेदीखत रद्द होवुन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. त्यांचे पुढे असे कथन आहे की, वादीने प्रतिवादी नं.१ व इतर वारस यांच्याविरूध्द वाटप होवुन मिळणेकामी रे.मु.नं. ५५/२०२५ कळवण येथील न्यायालयात दाखल केलेला होता. सदर दावा दि. ०६.०३.२०१० रोजी अंशत: मंजुर झालेला आहे. परंतु वादीने त्या निकालाबाबतचा मजकुर प्रस्तुत दाव्यात दाखल केलेला नाही. वादीने सदर आदेशाविरूध्द जिल्हा न्यायालयात अपील दाखल केलेले नाही. वादीने सदर आदेशाविरूध्द दरखास्त देखील दाखल केलेली नाही. दावा मिळकत प्रतिवादी नं.१ यांनी त्यांच्या स्वकष्टार्जीत उत्पन्नातुन सन १९७० मध्ये विकत घेतलेली आहे. परंतु त्या खरेदीखताबाबतचा मजकुर वादीने हेतुपुरस्कर दाव्यात समाविष्ट केलेला नाही.

०३. प्रतिवादी नं.१ व ७ यांचे पुढे असे कथन आहे की, वादी व प्रतिवादी नं.२ हे सख्खे भाउ असुन त्यांनी प्रतिवादी नं.१, ७ ते ९ यांच्याविरूध्द फेरफार रद्द होवुन मिळणेकामी आरटीएस अपील दाखल केलेले होते. प्रतिवादी नं.१ यांनी प्रतिवादी नं.७ यांना दावा मिळकतीमधील क्षेत्र विक्री केलेले असुन सदर खरेदीखताचा दस्त दुय्यम निबंधक यांच्याकडे नोंदविण्यात आलेला आहे. वादीने सदर खरेदीखताच्या नोंदीबाबत हरकत घेतलेली आहे. त्यामुळे वादीला सदर खरेदीखताबाबत संपुर्ण माहिती होती. तरीदेखील त्याने न्यायालयाची दिशाभुल करण्याच्या गैर उद्देशाने तसेच दावा मुदतीत आणण्यासाठी खोटा मजकुर नमुद केलेला असुन दावा रद्द करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०४. प्रतिवादी नं.१ यांनी प्रतिवादी नं.७ यांना दावा मिळकतीमधील क्षेत्र विक्री केल्याबाबत वादी यांना माहिती होती, तरीदेखील त्यांनी दाव्यातील कारण खोटे नमुद केलेले आहे. प्रतिवादी नं.१ व ७ यांचे पुढे असे कथन आहे की, वादीने आव्हानीत केलेल्या खरेदीखतातील नमुद रकमेनुसार आवश्यक तो मुद्रांक

भरलेला नाही. तसेच खरेदीखतामधील रक्कम ही रू. ५ लाखापेक्षा जास्त असल्याने सदर दावा न्यायालयाच्या न्यायकक्षेबाहेर असल्याने त्या कारणावरून देखील प्रस्तुतचा दावा रद्द होण्यास पात्र आहे. दावा मिळकतीचा संपुर्ण कब्जा प्रतिवादी नं.१ याचाच होता. प्रतिवादी नं.१ याने प्रतिवादी नं.७ याला क्षेत्र विक्री केलेले असुन प्रतिवादी नं.७ यांनी त्यांच्या कब्जेवहीवाटीतील मिळकत प्रतिवादी नं.८ व ९ यांना विक्री केलेली आहे. वादीने उपविभागीय अधिकारी चांदवड यांच्या न्यायालयात, तहसिलदार, जिल्हाधिकारी, मुद्रांक जिल्हाधिकारी यांच्याकडे वेगवेगळे व खोटया वर्णनाचे कागदपत्रे दाखल केलेले असुन प्रतिवादी नं.१ व ७ यांना त्रास दिलेला आहे. वादीने पुर्वी दाखल केलेला रे.मु.नं.५५/२००५ यामध्ये निकाल झालेला असल्याने नविन दावा दाखल करण्यास बाध आहे. तसेच वादीने मुदतबाहय दावा दाखल केलेला असल्याने दावा रद्द होण्यास पात्र आहे.

०५. वादीने दाव्यातील कथने व मागणीबाबत न्यायालयाच्या कक्षेबाहेरील असल्याने या न्यायालयास दाव्याचे कामकाज चालविता येणार नाही. वादीने दावा मिळकतीचे वर्णन व चतु:सिमा खोटया व चुकीच्या नमुद केलेल्या आहेत. वादीला प्रस्तुतचा दावा दाखल करण्यास कोणतेही कारण घडलेले नाही. वादीने दाव्याच्या विषयाची किंमत चुकीची करून त्यावर अपुर्ण मुद्रांक भरलेला आहे. प्रस्तुतचा दावा रद्द झाल्यास न्यायालयाचा वेळ वाचणार आहे. त्यामुळे वादीचे कोणतेही नुकसान होणार नसुन प्रतिवादींचा अर्ज नामंजुर झाल्यास त्यांचे कधीही न भरून येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ नुसार वादीचा दावा रद्द करण्यात यावा.

०६. वादी यांनी सदर अर्जास निशाणी ४५ अन्वये त्यांचा लेखी जबाब दाखल केलेला आहे. त्यांचे असे कथन आहे की, वादीला सदर अर्जातील मजकुर मान्य व कबुल नाही. प्रतिवादी नं.१ व ७ यांनी अर्जात केलेली विधाने पुराव्यानिशी शाबीत करणे आवश्यक आहे. वादीने रे.मु.नं. ५५/२००५ मध्ये झालेला आदेश बरोबर असल्याचे कथन केलेले आहे. वादीने प्रतिवादी यांच्याविरूध्द चांदवड येथील उपविभागीय अधिकारी यांच्याकडे आरटीएस अपील दाखल केल्याचे मान्य केलेले आहे.

०७. वादीचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी नं.१ व ७ यांनी

वादीची प्रतिमा मलीन करण्याच्या उद्‌देशाने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. प्रतिवादी नं.१ व ७ यांनी दाव्याचा व दस्तांची सखोल पडताळणी न करता न्यायालयाच्या आदेशाचे अवमानना करून बेकायदेशीर कृत्य कायदेशीर असल्याचे भासवुन प्रस्तुतचा अर्ज न्यायालयात दाखल केलेला आहे. त्यातील कथने बरोबर व कायदेशीर नाहीत. त्यामुळे वादीचा दावा विनासाक्षीपुरावे व चौकशीशिवाय रद्‌द करता येणार नाही. न्यायालयाने प्रस्तुत प्रकरणात साक्षीपुरावे घेतल्यास त्यायोगे वादी व प्रतिवादी यांना त्यांचे म्हणणे न्यायालयासमोर मांडण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे न्यायालयास न्यायनिर्णय करणे सोयीचे होणार आहे. वादीचा दावा प्राथमिक अवस्थेत रद्‌द झाल्यास त्यामुळे वादीवर अन्याय होणार आहे. तरी वरील सर्व कारणांचा विचार करून प्रस्तुत प्रतिवादी नं.१ व ७ यांनी दाखल केलेला अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी मागणी केलेली आहे.

०८. वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले.

०९. प्रतिवादी नं.१ व ७ यांचे असे कथन आहे की, वादीने कळवण येथील दिवाणी न्यायालयात रे.मु.नं.५५/२००५ दाखल केला होता व त्याबाबतचा मजकुर हेतुपुरस्कर दाव्यात नमुद केलेला नाही. याठिकाणी हे नमुद करणे गरजेचे आहे की, वादीने त्याच्या दाव्यामध्ये परिच्छेद क्र.३, ४ व ५ मध्ये सदर रे.मु.नं.५५/२००५ बाबतचा मजकुर नमुद केलेला आहे. त्यामुळे वादीने सदर दाव्याबाबतचा मजकुर दाव्यात नमुद केला नाही असे याठिकाणी म्हणता येणार नाही. प्रतिवादी नं.१ व ७ यांच्या कथनानुसार वादी व प्रतिवादी नं.२ यांनी उपविभागीय अधिकारी यांच्याकडे प्रतिवादी नं.१, ७ ते ९ यांच्याविरूध्द चांदवड येथील उपविभागीय अधिकारी यांच्याकडे आरटीएस अपील दाखल केलेले होते, त्यांनी मुख्य नियंत्रक महसुल अधिकारी, नोंदणी महानिरिक्षक महाराष्ट्र राज्य यांच्याकडे अपील, तहसिलदार व इतर शासकिय कार्यालयात सन २०११ च्या खरेदीखतानुसार नोंद मंजुर होवु नये व खरेदीखतानुसार झालेली नोंद रद्‌द होवुन मिळणेकामी हरकत घेतली होती. याउलट वादीने त्याच्या दाव्यामध्ये सदर खरेदीखतासंदर्भात झालेल्या नोंदी या उपविभागीय अधिकारी यांच्याकडे आरटीएस अपील दाखल करून त्यात

हरकत घेतली होती असे जरी दाव्यात नमुद केलेले नसले तरीदेखील त्याने दाव्यामध्ये सन डिसेंबर २०२१ च्या सुमारास झालेल्या घटनेबाबत तसेच दि.२९.०९.२०२२ रोजी सक्षम न्यायालयाने खरेदीखत रद्द केले नसल्याने नोंद रद्द करण्यात येत नाही असे कारण देत त्यांचा अर्ज फेटाळला होता असे नमुद केलेले आहे. याठिकाणी हे नमुद करणे गरजेचे आहे की, वादीला सदर प्रतिवादी यांनी मिळकत खरेदी घेतल्याचे सांगितले व त्यानंतर त्याने महसुल अभिलेख काढुन त्याविरूध्द महसुल न्यायालयात अपील दाखल केल्याचे कथन केलेले आहे.

१०. वादीच्या कथनानुसार त्याला सन डिसेंबर २०२१ च्या सुमारास सदर खरेदीखताबाबत पहिल्यांदा माहिती झाली असे प्रथमदर्शनी दिसुन येते. याठिकाणी हेदेखील नमुद करणे गरजेचे आहे की, वादीला सदर खरेदीखतांबाबत माहिती झाले होते हे कारण जाणुन घेण्याची तारीख ही मर्यादा मोजतांना कायदा आणि वस्तुस्थितीचा मिश्र प्रश्न असल्याने त्याबाबत दोन्ही पक्षकारांना पुरावे सादर करण्याची संधी देणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रस्तुतचा दावा हा आजरोजी मुदतबाहय आहे या निष्कर्षाप्रत येता येणार नाही. याठिकाणी मा.सर्वोच्च न्यायालय यांनी ***पी.कुमार कुरूबारण वि. पी.नारायण व इतर, २०२५ लाईव्ह लॉ (एससी ५०९)*** या न्यायनिवाडयाचा आधार घेता येईल. सदर न्यायनिवाडयात मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाने दावा मुदतबाहय असल्याने आदेश ७ नियम ११ अन्वये वादपत्र हे प्रथमदर्शनी मुदतबाहय असल्याने दावा फेटाळुन लावतांना वादीने सदर दाव्यामध्ये त्याला माहिती मिळाल्याची जी कथने केली होती त्याबाबत त्याची योग्य पडताळणी न करता सदरचा दावा जो फेटाळण्यात आला होता तो चुकीचा होता असे नमुद केलेले आहे. प्रस्तुत प्रकरणात देखील दाव्यास घडलेले कारण जे वादीने कथन केलेले आहे, ज्यामध्ये त्याला सन डिसेंबर २०२१ च्या सुमारास घडलेल्या घटनेबाबत माहिती झाले असे जे कथन केलेले आहे त्या कथनासंदर्भात योग्य तो पुरावा दोन्ही पक्षकारांना संधी देवुन पडताळुन पाहणे गरजेचे आहे. त्यामुळे याठिकाणी दाव्याच्या या टप्प्यावरून वादीने दाव्यास घडलेले कारण हे मुदतबाहय आहे असे असे म्हणता येणार नाही.

११. प्रतिवादी नं.१ व ७ यांचे असे कथन आहे की, वादीला सन

२०११ पासुन खरेदीखतांबाबत संपुर्ण माहिती होती व त्याबाबत त्यांनी वेळोवेळी हरकती नोंदविलेल्या आहेत व त्याने त्यासंदर्भात लेखी हरकती नोंदविलेल्या असल्याने त्याने दाव्यात खोटा मजकुर नमुद केलेला असुन दाव्यास कारण घ ाडल्याचे देखील खोटे नमुद केलेले आहे. याठिकाणी हे नमुद करणे आवश्यक आहे की, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ नुसार जर वादीने दाव्यामध्ये दाव्यास कारण घडल्याचा मजकुर जर नमुद केला नाही तर त्या परिस्थितीमध्ये वादपत्र फेटाळता येवु शकते. परंतु प्रस्तुत प्रकरणात वादीने वादपत्रामध्ये दाव्यास कारण घडल्याचा मजकुर नमुद केलेला आहे. त्यामुळे त्या परिस्थितीमध्ये वादपत्र फेटाळता येणार नाही. याठिकाणी जरी वादीने वादपत्रामध्ये दाव्यास घडलेले कारण खोटे असल्याचे जरी नमुद केले आहे असे ग्राहय धरले तरीदेखील त्या कारणावरून दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ नुसार वादपत्र फेटाळता येणार नाही. त्या प्रकारची तरतुद दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ मध्ये कुठेही नमुद करण्यात आलेली नाही.

१२. प्रतिवादी नं.१ व ७ यांचे पुढे असे कथन आहे की, वादीने आव्हानीत केलेल्या सन २०११ व सन २०२१ च्या खरेदीखतातील नमुद रकमेनुसार आवश्यक तो मुद्रांक शुल्क भरलेला नाही. तसेच खरेदीखतातील रक्कम ५ लाखापेक्षा जास्त असल्याने सदर दावा न्यायकक्षेबाहेर आहे व त्या कारणावरून देखील दावा फेटाळण्यात यावा असे कथन केलेले आहे. याठिकाणी हे नमुद करणे आवश्यक आहे की, सदर २०११ व २०२१ च्या खरेदीखतामध्ये वादी हा पक्षकार नसल्याचे स्पष्ट आहे. वादी हा त्रयस्थ इसम असल्याने त्याला महाराष्ट्र कोर्ट फी ॲक्ट कलम ६(आयव्ही) (एचए) नुसार खरेदीखतातील रकमेनुसार मुद्रांक शुल्क भरणे आवश्यक नसुन त्याने कलम ६ (आयव्ही) (जे) नुसार योग्य तो मुद्रांक शुल्क भरणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणात वादीने सदर खरेदीखतातील रक्कमेवर त्याचा १/७ एवढा हिस्सा असल्याचे दाखवुन त्यावर मुद्रांक शुल्क रक्कम रू.१२,०३०/— एवढा भरलेला आहे. त्यामुळे वादीने जेवढा मुद्रांक शुल्क भरणे आवश्यक होते त्यापेक्षा जास्त मुद्रांक शुल्क भरला असल्याने वादीने प्रस्तुत प्रकरणात अपुर्ण मुद्रांक शुल्क भरला आहे असे याठिकाणी म्हणता येणार नाही. वादीने खरेदीखतातील रकमेवर योग्य तो मुद्रांक शुल्क भरणे गरजेचे नसल्याने सदर

खरेदीखतामधील रक्कम ही ५ लाखापेक्षा जास्त आहे असे याठिकाणी म्हणता येणार नाही. त्यामुळे प्रस्तुतचा दावा न्यायालयाच्या न्यायकक्षेबाहेर आहे असे देखील म्हणता येणार नाही.

१३. प्रतिवादी नं.१ व ७ यांचे असे देखील कथन आहे की, वादीने दावा मिळकतीचे वर्णन व चतु:सिमा खोटया व चुकीच्या नमुद केलेल्या आहेत. याठिकाणी हे नमुद करणे गरजेचे आहे की, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ७ नियम ११ नुसार दावा मिळकतीचे वर्णन व चतु:सिमा खोटया असल्याच्या कारणावरून वादपत्र फेटाळता येवु शकते असे त्या नियमांमध्ये नमुद केलेले नाही. त्यामुळे सदर कारणावरून देखील वादपत्र हे फेटाळता येणार नाही.

१४. त्यामुळे वरील चर्चेअंती हे स्पष्ट होते की, वादीचा दावा हा मुदतबाहय नसुन मुदतीत आहे. तसेच वादीने दाव्याची किंमत ही चुकीची दाखवुन त्यावर अपुर्ण मुद्रांक शुल्क भरलेला आहे असे म्हणता येणार नाही. वादीने योग्य ती दाव्याची किंमत करून त्यावर आवश्यक तेवढा मुद्रांक भरलेला आहे. सबब, प्रतिवादी नं.१ व ७ यांचा अर्ज फेटाळणे आवश्यक आहे. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करित आहे.

## —:: **आदेश** ::—

१. अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

२. प्रस्तुतच्या अर्जाचा खर्च हा ज्याचा त्याने सोसावा.

**( व्ही. बि. चव्हाण )**
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
कळवण.

ठिकाण :— कळवण.
दिनांक :— १७/०३/२०२६.